# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२५

-------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५ / फाल्गुन ३०, १९४६ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वैद्यकीय शिक्षण मंत्री** | |
| **(२)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(३)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | |
| **(४)** | **उद्योग, मराठी भाषा मंत्री** | |
| **(५)** | **महिला व बालविकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(६)** | **ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** | |
| **(७)** | **कामगार मंत्री** | |
| **(८)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |

-------------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ४३**

-------------------------------------------

### अमरावती औद्योगिक वसाहतीमधील अनेक भूखंड विनावापर असल्याबाबत

**(१) * ८१९ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यामध्ये औद्योगिक वापरासाठी विजेची उपलब्धता असल्यामुळे येथील औद्योगिक वसाहतीत भूखंडाची मागणी करणाऱ्यांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्या
ची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमआयडीसीमध्ये औद्योगिक वापरासाठी भूखंड प्राप्त झाल्यापासून दोन वर्षांच्या आत उद्योग सुरू करणे अनिवार्य असूनही अमरावती औद्योगिक वसाहतीमधील विविध उद्योगांकरीता वाटप करण्यात आलेल्या भूखंडावर अद्यापपर्यंत उद्योग सुरू न झाल्याने सदर भूखंड विनावापर आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत अमरावती औद्योगिक वसाहतीमध्ये किती भूखंड विनावापर आहेत तसेच उक्त भूखंडावर उद्योजकांकडून अद्याप उद्योग सुरु न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर भूखंड विनावापर ठेवणाऱ्या संबंधित उद्योजकांवर शासनाने कोणती कारवाई केली व सदरहू भूखंड पुन्हा ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) होय, हे अंशत: खरे आहे.

अमरावती औद्योगिक क्षेत्रामध्ये महामंडळाकडून एकूण ६०६ भूखंडाचे आरेखन करुन वाटप करण्यात आलेले आहे. त्यापैकी ५२४ भूखंडावर उत्पादन सुरु आहे. वाटप झालेले परंतु सध्यस्थितीत मोकळे असलेल्या एकूण भूखंडाची संख्या २० आहे. सदर भुखंडाचा विकास कालावधी अद्याप शिल्लक आहे. सदर भुखंड धारक यांनी विहित कालावधीत भुखंडाचा विकास न केल्यास महामंडळाचे नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथील घाटी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाकरीता नवीन शस्त्रक्रिया इमारत उभारण्याबाबत

**(२) * २४७ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथील घाटी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाची स्थापना सन १९६० च्या दरम्यान झाली असून या रुग्णालयाची मुख्य शस्त्रक्रिया इमारत ५५ वर्षापुर्वीची असल्याने सदर इमारत धोकादायक झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी घाटी रुग्णालयाची पाहणी दिनांक १६ सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास करुन रुपये ७६८ कोटी रुपयांची नवीन शस्त्रक्रिया इमारत व वाढीव ३०० मनुष्यबळास मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे निर्देश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्देशानुसार घाटी रुग्णालय प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी नवीन शस्त्रक्रिया इमारतीसाठी रुपये ७६८ कोटींचा विकास आराखडा शासनाकडे सादर केला असून त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, घाटी रुग्णालयाने शासनाकडे सादर केलेला विकास आराखडा मंजूर करून नवीन शस्त्रक्रिया इमारत उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय

(२) होय

(३) व (४) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथील नवीन शस्त्रक्रिया इमारत बांधकामाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर व स्तनदा मातांना मिळणाऱ्या आहाराच्या दरात वाढ करण्याबाबत

**(३) * ८९७ श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१७ मध्ये अंगणवाडी लाभार्थ्यांना प्रतिदिनी रुपये ८, स्तनदा व गर्भवती मातांसाठी रुपये ९.५० व कुपोषित बालकांसाठी रुपये १२ प्रमाणे लाभार्थ्यांना गरम व ताजा आहार देण्याचे शासनाने निश्चित केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१७ नंतर आजपर्यंत जीवनावश्यक खाद्यपदार्थांचे भाव वाढले असल्यामुळे इंधन खर्च, आहार, धान्य वाहतूक, मजुरी, जीएसटी या सर्व बाबींचा विचार करता दुपारचे जेवण व नाश्ता इत्यादी करीता दिला जाणारा दर परवडत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रातील लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आहाराचा खर्च रुपये ४५ च्या आत येत असून आदिवासी विभागातील लाभार्थ्यांना मिळणारा आहार आणि इतर योजनांमध्ये समाविष्ट असलेला आहार यांचा दर समसमान असावा याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,
(४) असल्यास, सदरहू लाभार्थींना व गरोदर व स्तनदा मातांना पुरविला जाणारा आहार हा निकृष्ट दर्जाचा असल्याने त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असून याप्रकरणी शासनाने लाभार्थ्यांना गरम व ताजा आहार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) एकात्मिक बालविकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून या योजनेंतर्गत पुरक पोषण आहाराचे दर केंद्र शासनाकडून निश्चित करण्यात येतात. पुरक पोषण आहाराचे सदर दर केंद्र शासनाने सन २०१७ मध्ये निश्चित केले होते. त्यामध्ये वाढ करण्याबाबत केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(३) डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना या राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रातील गरोदर महिला व स्तनदा माता यांना एकवेळचा चौरस आहार प्रति दिन देण्यात येतो, तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना अंडी किंवा केळी देण्यात येतात. सदर योजनेंतर्गत गरोदर महिला व स्तनदा माता यांना देण्यात येणाऱ्या चौरस आहाराच्या दरामध्ये शासन निर्णय दिनांक १०/०७/२०२३ अन्वये वाढ करण्यात आली आहे.

एकात्मिक बालविकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेमधील पूरक पोषण आहाराच्या दरामध्ये वाढ करण्याबाबत केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(४) हे खरे नाही.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत पुरवठा करण्यात येणाऱ्या घरपोच आहाराची पुरवठाधारकाकडून इनहाउस लॅबमध्ये अंगणवाडीस्तरावर पुरवठा करण्यापूर्वी व पुरवठा झाल्यानंतर संबंधित जिल्ह्याचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांचेमार्फत शासनमान्य प्रयोगशाळेकडून रॅन्डमली तपासणी केली जाते. तसेच, गरम ताजा आहाराची तीन महिन्यातून एकदा शासनमान्य प्रयोगशाळेकडून रॅन्डमली तपासणी केली जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या अनुदानावरील योजनांच्या निधीमध्ये वाढ करण्याबाबत

**(४) * ३६७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाच्यावतीने शेतकऱ्यांसाठी विविध योजना शासनाकडून राबविण्यात येत असून शेतकऱ्यांसाठी कडबा कुट्टी, स्प्रे पंप, रोटावेटर, पॉवर विडर इत्यादी अनुदानावरील योजना राबवितांना शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनांसाठी सन २०२४ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ६५८५ इतके प्रस्ताव शेतकऱ्यांनी सादर केले असून त्यातील केवळ १०३३ शेतकऱ्यांनाच लाभ मिळाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनांतर्गत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानाचा निधी वाढवून देण्याबाबत तसेच सदर योजनेचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांना मिळण्याकरीता तसेच योजनांची परिणामकारकता वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) व (२) खरे आहे.

सदर योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी विविध कृषी साहित्य खरेदी करण्यासाठी दरवर्षी जिल्हा परिषद सेस फंडातून निधीचे लक्ष्य निर्धारित करण्यात येते.

सन २०२४-२५ मध्ये जिल्हा परिषदेला सदर योजनेच्या उद्दिष्टांपेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्याने कृषी समितीच्या बैठकीमध्ये प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लॉटरी पध्दतीने लाभार्थ्यांची निवड केलेली आहे.

सदर योजनेंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांना साहित्याच्या खरेदी किमतीच्या ५०% रक्कम किंवा १०,००० रुपये पैकी जे कमी असेल तितकी रक्कम थेट लाभ हस्तांतरणाच्या (DBT) मार्फत त्यांच्या बँक खात्यात दिली जाते.

(३) सदर योजना जिल्हा परिषद स्वनिधी मधून राबविण्यात येते. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता कोल्हापूर जिल्हा परिषदेने रुपये २,१२,००,०००/- ची तरतूद केली होती. आता त्यांनी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी रुपये २,५४,००,०००/- इतकी तरतूद केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांनी विद्यावेतनाचा तपशील सादर करण्याबाबत

**(५) * ४०९ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या विद्यावेतनाचा तपशील प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला वैद्यकीय महाविद्यालयांनी सादर करण्याचे आदेश राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने माहे एप्रिल, २०२४ मध्ये दिले असूनही, राज्यातील २० वैद्यकीय महाविद्यालयांनी विद्यावेतनाचा तपशील सादर केला नसल्याने राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने कारणे दाखवा नोटीस संबंधित वैद्यकीय महाविद्यालयांना माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान पाठविली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यावेतनाचा तपशील सादर न करणाऱ्या २० वैद्यकीय महाविद्यालयांवर कोणती कारवाई केली तसेच वैद्यकीय महाविद्यालयांनी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने दिलेल्या आदेशानुसार विहित मुदतीत तपशील सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या दिनांक २८/११/२०२४ रोजीच्या पत्रान्वये विद्यावेतनाचा तपशील सादर न केलेल्या राज्यातील एकूण २० वैद्यकीय महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यामध्ये ११ शासकीय/ महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालये आणि ०९ खाजगी विनाअनुदानित/ अभिमत विद्यापीठ वैद्यकीय महाविद्यालयांचा समावेश होता.
(२) राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विद्यावेतनाची माहिती तात्काळ सादर करणेबाबत वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या दिनांक ०२/१२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांना निर्देश देण्यात आले होते. त्यानुषंगाने राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांनी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडे विद्यावेतनाची माहिती सादर केलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदूरा (ता.जि.हिंगोली) येथील जल जीवन मिशन योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६) * ८९२ डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे नांदूरा (ता.जि.हिंगोली) येथील ग्रामीण जलजीवन मिशनची कामे निकृष्ट दर्जाची झालेली असून, सदर कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याने येथील ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेसमोर आंदोलन करुन उक्त कामांच्या चौकशीची मागणी केल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय आहे,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच जलजीवन मिशनची कामे उत्कृष्ट दर्जाची होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय,

मौजे नांदुरा, ता.जि.हिंगोली येथील ग्रामस्थांनी त्यांच्या गावातील पाणीपुरवठा बंद पडल्यामुळे दिनांक ०७/०१/२०२५ च्या निवेदनानुसार जिल्हा परिषद, हिंगोली कार्यालयासमोर तसेच गावातील पाण्याच्या टाकीवर आंदोलन करुन नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामाची चौकशी करणेसाठी तसेच गावासाठी पाणीपुरवठा सुरु करण्याची मागणी केली होती.

(२) मौजे नांदुरा, ता.जि.हिंगोली येथील ग्रामस्थांच्या तक्रारीच्या अनुषंगाने उद्भव विहीरीच्या जागेचा प्रश्न ग्रामपंचायतीमार्फत रजिस्टर्ड दानपत्र घेऊन निकाली काढण्यात आला आहे. तसेच, सदर प्रकरणी संयुक्त चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, कळमनुरी व त्रयस्थ तांत्रिक तपासणी संस्था टाटा कन्सल्टींग इंजिनियर्स लि. यांना आदेशित करण्यात आले आहे. सदर योजनेची उर्वरीत अपूर्ण कामे व त्रुटींची पुर्तता करण्यासाठी संबंधित कंत्राटदारास कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, हिंगोली यांच्यामार्फत नोटीस देण्यात आली आहे. जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनांच्या कामांच्या गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी शासनामार्फत टाटा कन्सल्टींग इंजिनियर्स लि. या त्रयस्थ तांत्रिक तपासणी संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा येथील महिला रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(७) * २०९ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा येथे १० वर्षांपासून महिला रुग्णालयाची इमारत बांधून पूर्ण असतानाही रुग्णालय अद्यापही सुरु झाले नसल्याचे तसेच सामान्य रुग्णालयात रुग्ण खाटांची संख्या ४०० असून महिला रुग्णांची संख्या अधिक असल्याने रुग्णालयात येणाऱ्या महिलांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिला ग्रामीण रुग्णालय, भंडारा यास क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले रुग्णालय हे नाव देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १६ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भंडारा येथे १०० खाटांचे महिला रुग्णालय सुरु करुन रिक्त पदे भरण्याबाबत तसेच सदरहू रुग्णालयाचे नामकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

भंडारा येथील महिला रुग्णालय इमारतीचे टप्पा-१ व टप्पा-२ चे बांधकाम सुरु झाले असून दोन्ही बांधकामांचे एकत्रीतपणे एकूण ७५ टक्के काम पूर्ण झालेले आहे.

सामान्य रुग्णालय, भंडारा हे ४८२ खाटांचे रुग्णालय असून येथे मर्यादित खाटांचे अभावी महिला रुग्णांची गैरसोय होत नाही. येथे महिला उपचारांच्या सुयोग्य अशा सोयी सुविधा उपलब्ध आहेत. तथापि, महिलांवरील स्वतंत्र उपचाराकरीता महिला खाटांची संख्या वाढविण्यासाठी महिला रुग्णालयाच्या बांधकामाची प्रक्रिया सुरु आहे.

(२) होय.
(३) शासन निर्णय दिनांक १३/०२/२०२५ नुसार स्त्री रुग्णालय भंडारा येथे ९७ पदांना मंजूरी प्राप्त झालेली आहे. शासन निर्णय क्र.संकीर्ण२०१२/प्र.क्र.१९२/१२/ आरोग्य-३अ दिनांक ०१ जून २०१२ अन्वये महापुरुषांचे नाव देण्यामुळे भविष्यात कोणताही वाद उद्भवू नये यासाठी आरोग्य विभागाच्या अखत्यारितील आरोग्य संस्था व मालमत्तेला महापुरुषांचे नाव देण्यास मनाई करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील वाशी, शिर्की, खारेपाट भागातील गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण झाल्याबाबत

**(८)** * **२२२ श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील वाशी, शिर्की, खारेपाट या भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत असून पाण्यासाठी महिलांना सुमारे २ ते ३ किलोमीटर पायपीट करावी लागत असल्याची बाब दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पेण तालुक्यातील ३९ गावे आणि १०३ वाड्यांवर पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने निधी खर्च केला असूनही अद्यापही येथील पाणीटंचाईची समस्या सोडविण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पेण तालुक्यातील विविध गावांतील पाणीटंचाईची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे,

शहापाडा प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेद्वारे खारेपाट विभागातील गावांना पाणीपुरवठा करण्यात येतो. परंतु दिनांक १५ जानेवारी ते २० जानेवारी २०२५ दरम्यान योजनेची मुख्य पाईप लाईनवर गळती झाल्यामुळे खारेपाटातील सदर गावांचा पाणीपुरवठा खंडीत झाला होता.त्यानंतर सदर मुख्य पाईप लाईनवरील गळती दुरुस्ती करण्यात येऊन सदर गावांचा पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.
(२) व (३) हे अंशतः खरे आहे.

म.जी.प्रा. मार्फत जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मूळ शहापाडा ३८ गावे व १०८ वाड्या योजनेतील वितरण व्यवस्था नुतनीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. सद्य:स्थितीत सदर योजनेतून ९ गावे व ४० वाड्यांना पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. सदर योजनेतील उर्वरित कामे प्रगतीपथावर असून सदर योजनेतील उपांगांसाठी ग्रामपंचायतीकडून वेळेत जागा उपलब्ध करून न देणे, स्थानिक ग्रामस्थांचा विरोध यामुळे योजना पूर्ण करण्यास विलंब झाला आहे. तसेच सर्व गावे व वाड्या यांचा पाणी पुरवठ्याचा प्रश्न सोडविण्याकरीता प्रत्यक्षात आवश्यक कामांसह सादर केलेल्या सुधारीत योजनेस शासनाने सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सदर योजना माहे जून-२०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन म.जी.प्रा. मार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सात जिल्ह्यांतील भूजल पाणीसाठ्यात नायट्रेटच्या प्रमाणात वाढ झाल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(९) * ६४ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वर्धा, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नांदेड, बीड आणि जळगाव या सात जिल्ह्यांतील भूजलात नायट्रेट या विषारी रसायनाचे प्रमाण धोकादायक पातळीपेक्षा अधिक प्रमाणात असल्याचे केंद्रीय भूजल मंडळाच्या 'वार्षिक भूजल गुणवत्ता अहवाल – २०२४' मध्ये नमूद असल्याची बाब दिनांक ४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जागतिक आरोग्य संघटना आणि भारतीय मानक ब्यूरो यांनी निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा राज्यातील या सात जिल्ह्यात पिण्याच्या पाण्यामध्ये नायट्रेटचे प्रमाण जास्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने तपासणी केली आहे काय, तपासणीत काय आढळून आले आहे, त्यानुसार सदर सात जिल्ह्यांतील जनतेला शुध्द पिण्यायोग्य पाणी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) उक्त प्रकरणी शासनाने तपासणी केली असून, तपासणीमध्ये खालील बाबी आढळून आल्या आहेत :-

(अ) केंद्र शासनाच्या भूजल मंडळाने प्रसिध्द केलेल्या वार्षिक भूजल गुणवत्ता अहवाल सन २०२४ नुसार, केंद्र शासनाच्या भूजल मंडळामार्फत, भूजलातील पाणी पातळी व पाणी गुणवत्ता तपासणी अशा संशोधनात्मक अभ्यासासाठी देशातील विविध ठिकाणांच्या एकूण १५२५९ पाणी नमुन्यांची तपासणी करण्यात आली. त्याअंतर्गत आपल्या राज्यातील एकूण १५६७ ठिकाणांच्या पाणी नमुन्यांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ५६० पाणी नमुने नायट्रेट बाधित आढळून आले आहेत. तसेच प्रश्नात नमुद केलेल्या ७ जिल्ह्यांच्या भूजलामध्ये तपासलेल्या एकूण ४३१ नमुन्यांपैकी २१९ नमुने नायट्रेट बाधित आढळून आले आहेत.

(ब) राज्य शासनाच्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील सर्व सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे व घरगुती नळ जोडणीच्या पाणी नमुन्यांची (FHTC) रासायनिक तपासणी वर्षातून एकदा व जैविक तपासणी वर्षातून दोनदा करण्यात येते. राज्य शासनाच्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या सन २०२४-२५ च्या पाणी नमुने तपासणी नुसार, प्रश्नातील ७ जिल्ह्यांमध्ये नायट्रेट या घटकाने बाधित नमुन्यांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे. :-

| अ.क्र. | जिल्हा | रासायनिक तपासणी केलेले एकूण पाण्याचे नमूने | नायट्रेट बाधित पाण्याचे नमूने |
|---|---|---|---|
| १) | वर्धा | १३३० | ४९ |
| २) | बुलढाणा | ४१०४ | १६५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | अमरावती | २३६७ | १२० |
| ४) | नांदेड | ३८७७ | २१९० |
| ५) | बीड | ५२१९ | ०१ |
| ६) | जळगाव | २५०७ | २१८ |
| ७) | यवतमाळ | १००१० | ६७५ |
| **एकूण** | | **२९४१४** | **३४१८** |

(क) केंद्र शासनाने निश्चित केलेल्या बी.आय.एस. स्टॅंडर्ड नुसार ४५ मिली ग्रॅम/लिटर पर्यंत नायट्रेटचे प्रमाण असलेले पाणी पिण्यायोग्य आहे.

(ड) राज्यातील जनतेला शुध्द पिण्यायोग्य पाणी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.:-

i) शासन निर्णय दिनांक २०/०७/२०२२ अन्वये पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम (Water Quality Monitoring & Surveillance Programme) प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

ii) नळ पाणीपुरवठा योजनांतर्गत निवड करण्यात आलेल्या सर्व नोंदणीकृत पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची / वितरण बिंदूंच्या (शाळा, अंगणवाडी, घरे इ.) पाणी नमुन्यांची गावातील प्रशिक्षित महिला स्वयंसेवकांमार्फत प्रत्येक महिन्यात एकदा जैविक क्षेत्रिय तपासणी संचाव्दारे (FTK- H२S vials) तपासणी करण्यात येते.

iii) रासायानिक तपासणीत दूषित आढळून आलेल्या पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताभोवती ‘‘पाणी पिण्यास अयोग्य’’ असल्याबाबत फलक लावण्यात आले असून, स्त्रोत बंद करण्यात आले आहेत व पर्यायी स्त्रोतांमधून शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे.

iv) सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची दुरुस्ती तसेच सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे वेळोवेळी शुध्दीकरण करण्याच्या अनुषंगाने जनजागृती करण्यात आली आहे.

v) वर्षातून दोन वेळा स्त्रोत स्वच्छता सर्वेक्षण मोहिम राबवून दूषित स्त्रोतांवर उपाययोजना करण्यात येत आहेत.

vi) क्षेत्रिय कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार, नायट्रेटयुक्त / रासायनिक खते, औषधांचा पिकांवर अतिवापर, औद्योगिक आणि शहरी प्रदूषण, जमीन वापरातील बदल व जंगलतोड, वायुप्रदूषण, सेप्टीक प्रणालीची अकार्यक्षमता व गळती, भूगर्भातील नैसर्गिक बदल, सांडपाण्याचे गैरव्यवस्थापन इत्यादी कारणांमुळे पाण्याच्या स्त्रोतामध्ये नायट्रेटचे प्रमाण वाढत असल्याचे आढळून आले आहे. सदरहू प्रमाण कमी करण्यासाठी आवश्यक उपायायोजना तसेच जनजागृती करण्याबाबत कृषी व पदूम विभाग, उद्योग विभाग आणि पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत नवउद्योजकांची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(१०)** * **३६ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्ह्यात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत विविध बँकांकडे नवउद्योजकांची २,०४७ प्रकरणे मंजुरीसाठी गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याने सदरहू कर्ज प्रकरणे मंजूर करण्यासाठी त्यांना वारंवार जिल्हाधिकारी कार्यालय तसेच जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयात जावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवउद्योजकांना वितरित केलेल्या कर्जाची वसुली करण्यासाठी उद्योग विभागाने हमी देऊनही राष्ट्रीयकृत बँकांनी या योजनेतंर्गत प्रकरणे निर्णयाविना प्रलंबित ठेवली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत सदर कर्ज प्रकरणे / सुधारित प्रकरणे मंजूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली तसेच कर्ज प्रकरणे प्रलंबित ठेवणाऱ्या बँकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) नाही.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाची सुलभ अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कर्ज प्रस्तावापासून अनुदान वितरणापर्यंत सर्व प्रक्रीया maha-cmegp.gov.in या पोर्टलद्वारे राबविली जाते.

अर्जदाराने ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर त्यांच्या कर्ज प्रकरणाच्या सद्यःस्थितीबाबतची माहिती नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर प्राप्त होते. या संदर्भात कोणत्याही प्रक्रियेकरीता अर्जदारास जिल्हा उद्योग केंद्र कार्यालय किंवा जिल्हाधिकारी कार्यालयात फेऱ्या मारण्याची आवश्यकता नाही.

अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये गेल्या ३ वर्षामध्ये बँकाकडे शिफारस केलेल्या प्रकरणांपैकी २१९२ एवढी प्रकरणे मंजूर केले असून १५८२ एवढी प्रकरणे बँकाकडे प्रलंबित आहे.

(२) नाही.

नवउद्योजकांना वितरीत केलेल्या कर्जाची वसूली करण्यासाठी हमी देण्याची कोणतीही तरतूद मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेतंर्गत नाही. त्यामुळे अशा प्रकारची कोणतीही हमी उद्योग विभागाकडून राष्ट्रीयकृत बँकांना देण्यात येत नाही. सदर योजनेतंर्गत बँकाकडील प्रलंबित कर्ज प्रकरणांबाबत अंमलबजावणी यंत्रणा म्हणून उद्योग संचालनालयाकडून वेळोवेळी आढावा घेवून बँकाकडील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना निर्देशित करण्यात येते.

(३) अहिल्यानगर जिल्ह्यातील योजनेंतर्गत प्रलंबित कर्ज प्रकरणे मंजूर करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा अग्रणी बँक यांच्यामार्फत आयोजित जिल्हास्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीमध्ये विभागीय/क्षेत्रिय अधिकारी यांचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. तसेच महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांच्याकडून संबंधित जिल्ह्यातील बँक समन्वयकांची बैठक घेवून कर्ज प्रकरणे तातडीने मंजूर करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येतो. सदर योजनेची जलद व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विभागीय आयुक्त तसेच विभागीय उद्योग सहसंचालक यांच्यामार्फत विभागीय क्षेत्रिय बँक अधिकारी व जिल्हा बँक समन्वयक यांच्या सोबत बैठका आयोजित करून कर्ज प्रकरणे मंजूर करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मिरा-भाईंदर शहरातील पंडित भीमसेन जोशी (टेंबा) रुग्णालयात सिटी स्कॅनची सेवा उपलब्ध करून देण्याबाबत

**(११) * ५० अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची लोकसंख्या १३ ते १४ लाखांपर्यंत पोहचली असून तेथील सामान्य नागरिकांच्या उपचारार्थ मिरा-भाईंदर महानगरपालिकेने उभारलेले हे २०० खाटांचे पंडित भीमसेन जोशी (टेंबा) हे एकमेव शासकीय रुग्णालय असून, सदर रुग्णालय शासनाकडे नुकतेच हस्तांतरित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात सिटी स्कॅनची सेवा उपलब्ध नसल्यामुळे रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून, या रुग्णालयात सिटी स्कॅनची सेवा सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २१ सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने उभारलेल्या पंडित भीमसेन जोशी (टेंबा) रुग्णालयात सिटी स्कॅनची सेवा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) पंडित भीमसेन जोशी (टेंबा) रुग्णालयात सीटी स्कॅन सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी सेवा पुरवठादाराची नियुक्ती करुन दिनांक १८/०७/२०२२ रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत. तसेच, संबंधित सेवा पुरवठादारासोबत दिनांक १४/०८/२०२३ रोजी सेवा करार करण्यात आलेला आहे. संबंधित रुग्णालयात सीटी स्कॅन सेवा सुरु करण्यासाठी आवश्यक असलेले जागा दिनांक २०/११/२०२४ रोजी संबंधित सेवा पुरवठादारास हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. तसेच, सेवा पुरवठादारास पाणी तसेच विद्युत पुरवठा जोडणी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(४) सीटी स्कॅन सेवा सुरु करण्याची कार्यवाही चालू आहे.

-----------------

## मुंबई येथील कामा व जे.जे.रुग्णालयात भूलतज्ज्ञांची नियुक्ती करण्याबाबत

**(१२) * २६६ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महिलांकरीता राखीव असलेल्या कामा रुग्णालयात भूलतज्ज्ञ नसल्याने नियमित शस्त्रक्रिया प्रलंबित राहत असून प्रसुतीकरीता येणाऱ्या महिलांची गैरसोय होत आहे तसेच जे.जे. रुग्णालयातही भूलतज्ज्ञांची नियुक्ती करण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन्ही रुग्णालयात भूलतज्ज्ञांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३)) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.
(२) ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयात अध्यापकांची २४ पदे मंजूर असून त्यापैकी १२ पदे भरण्यात आली असून १२ पदे रिक्त आहेत. कामा व आल्बेस रुग्णालय हे मुंबई महानगर महाविद्यालयाशी संलग्नित केल्यामुळे दिनांक १९/०८/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये बधिरीकरणशास्त्र विभागात प्राध्यापक- १, सहयोगी प्राध्यापक - २ व सहाय्यक प्राध्यापक - ३ अशी एकूण ६ पदे मंजूर करण्यात आलेली असून त्यातील सहाय्यक प्राध्यापक पदावर १ भूलतज्ञ कार्यरत आहे. सर्व रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येतील. तसेच जिल्हा निवासी कार्यक्रमांतर्गत ८ वरिष्ठ निवासी (M.D. Anaesthesia) मुंबई महानगर महाविद्यालयांतर्गत कार्यरत असून त्यापैकी ४ कामा व आल्बेस रुग्णालयात कार्यरत राहणार आहेत. त्यामुळे भूलतज्ञांची कमतरता भासणार नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नायगाव (ता.खंडाळा, जि.सातारा) येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जन्मस्थळाचा परिसर विकास आराखडा मंजूर करण्याबाबत

**(१३)** * **३६० श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे नायगाव (ता.खंडाळा, जि.सातारा) येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जन्मस्थळाचा विकास आराखडा तयार करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ४ डिसेंबर, २०२३ रोजी शासनाकडे केली असून त्यानुषंगाने सदर आराखडा दिनांक ३० जुलै, २०२४ रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार शिखर समितीकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जन्मस्थळ परिसर विकास आराखड्यास शिखर समितीने मंजूरी दिली आहे काय,
(३) असल्यास, मौजे नायगाव (ता.खंडाळा, जि.सातारा) येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जन्मस्थळ परिसर विकास आराखडा मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली असून त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१), (२) व (३) मौजे नायगाव ता.खंडाळा, जि.सातारा येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जन्मस्थळ विकास आराखड्याबाबत जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडून प्राप्त प्रस्तावावर मा.उच्चाधिकार समितीच्या दिनांक २१/०८/२०२४ रोजीच्या बैठकीत विचार करण्यात आला होता.

तथापि, मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ०३/०१/२०२५ रोजी सावित्रीबाई फुलेंच्या जयंतीदिवशी, सावित्रीबाईंचे जन्मगाव, मौजे नायगाव ता.खंडाळा जि.सातारा येथे त्यांचे “स्मारक व महिला प्रशिक्षण केंद्र” उभारण्याची घोषणा केली आहे. त्याअनुषंगाने “ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक व महिला प्रशिक्षण केंद्र” यांचे सुमारे रुपये १४२.६० कोटी इतक्या रकमेचे अंदाजपत्रक व प्रस्ताव जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडून शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यात नवीन बालगृह आणि वसतिगृह उभारणीच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत

**(१४) * ११३ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गरजू आणि विविध गैरप्रकरणांतून सुटका करण्यात आलेल्या मुलांचा शासकीय बालगृह आणि स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहांमध्ये सांभाळ करण्यात येत असून सद्य:स्थितीत ठाणे जिल्ह्यात शासनमान्यता प्राप्त असलेली २८ बालगृहे असून यामध्ये सुमारे ७०० मुले वास्तव्यास आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यात सामाजिक संस्थांतर्फे मुलांची राहण्याची, जेवणाची, आरोग्याची तसेच मुलांच्या शिक्षणाचीदेखील सोय करण्यात येते, त्यामुळे ही बालगृहे गरजू मुलांच्या उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असल्याने गेल्या काही वर्षांत जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या विविध सर्वेक्षणांच्या माध्यमातून गरजू निराधार मुलांची संख्या २ हजारांहून अधिक वाढली असल्यामुळे या सर्व मुलांच्या सुरक्षित भविष्यासाठी आणि निवाऱ्यासाठी त्यांना अशा बालगृह आणि वसतिगृहांची नितांत गरज असतानाही गत पाच वर्षांपासून जिल्ह्यात बालगृह आणि वसतिगृहांसाठी स्वयंसेवी संस्थांना प्रमाणपत्र न मिळाल्याने गरजू मुलांचा सांभाळ करणाऱ्या सामाजिक संस्था हतबल झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यात नवीन शासकीय बालगृह आणि स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहांच्या उभारणीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम ४१ अन्वये ठाणे जिल्ह्यात ०५ शासकीय संस्था व २३ स्वयंसेवी संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले आहे. त्यामध्ये एकूण मंजूर प्रवेशित क्षमता १,११८ असून ठाणे जिल्ह्यातील प्रवेशित उपस्थिती ५७८ आहे.
(२) हे खरे नाही.

सर्वेक्षणाच्या माध्यमातून गरजू निराधार मुलांची संख्या २ हजाराहून वाढली असल्याबाबत अशा प्रकारचा कोणताही सर्वेक्षण अहवाल शासनास अथवा अधिनस्त कार्यालयास प्राप्त झालेला नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर, बोदवड, रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील जल जीवन मिशन योजनेची कामे पूर्ण करण्याबाबत

**(१५) * ९३१ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जल जीवन मिशन योजनेंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक घराला स्वच्छ आणि सुरक्षित पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट असून, ग्रामीण जनतेला या सुविधांचा लाभ मिळण्यासाठी जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गतच्या कामांना गती देऊन कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण होणे गरजेचे असताना मुक्ताईनगर, बोदवड, रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील १३० पाणीपुरवठा जल जीवन मिशन योजनेची कामे अपूर्णावस्थेत असून निकृष्ट दर्जाची झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यांमध्ये या योजनेच्या कामांकरीता लाखो रुपयांचा निधी मंजूर होऊनही सदर कामे अपूर्णावस्थेत आहेत तसेच योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व निधीचा अपव्यय झाला असून निधी खर्चाबाबत व अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

जल जीवन मिशन योजनेंतर्गत मुक्ताईनगर, बोदवड व रावेर या तालुक्यांची मिळून एकूण २०४ कामे असून १८९ कामांची भौतिक प्रगती खालीलप्रमाणे -

०% ते २५ % - ३७ कामे
२६% ते ५०% - ६४ कामे
५१% ते ७५% - ४५ कामे
७६% ते ९९% - ४३ कामे
१००% पूर्ण - १५ कामे

त्यामुळे योजनेची कामे अपूर्ण असली तरी प्रगतीपथावर आहेत ही वस्तुस्थिती आहे.

सदरची कामे चालू असताना विविध टप्प्यावर त्रयस्थ तांत्रिक तपासणी पथकामार्फत तपासणी करण्यात येते व त्यानंतरच पुढील कामे केली जातात. त्यामुळे जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत या तालुक्यातील निकृष्ट दर्जाची कामे होत असल्याची बाब खरी नाही.

(२) हे खरे नाही.

जल जीवन मिशन अंतर्गत कामांत प्रत्येक कामाचे देयक अदा करण्यापूर्वी त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करुन त्यानंतरच देयक अदा केले जाते.

अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी विभागाकडून विविध बैठका घेण्यात येत असून कामात विलंब दिसून आल्याने ३ कंत्राटदारांकडील ६ कामे काढून घेण्यात आली असून सदर कामांची नव्याने निविदा प्रक्रिया सुरु आहे. तसेच योजनेच्या कामामध्ये आवश्यक गती न ठेवणाऱ्या ९९ कामांवरील २९ कंत्राटदारांवर रुपये १८.८३ लक्ष दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यात ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसल्याबाबत

**(१६) * ७०१ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषदेमार्फत राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या कल्याणकारी योजना राबविल्या जात असून यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक असताना जालना जिल्ह्यातील ८५० पेक्षा अधिक ग्रामपंचायतींचा कारभार सांभाळण्यासाठी शासन नियुक्त ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक हे मुख्यालयी राहत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावांच्या विकासात महत्वाचे योगदान असणारा ग्रामपंचायतीचा कारभार सुधारण्यासाठी ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक मुख्यालयी राहण्याची आवश्यकता असतानाही सदरहू अधिकारी वारंवार गैरहजर राहून ग्रामविकास विभागाच्या धोरणांत्मक निर्णयाचे पालन करीत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मुख्यालयी न राहणाऱ्या ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) जालना जिल्ह्यामध्ये एकूण ७७८ ग्रामपंचायती असून त्याकरीता एकूण ६४८ ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी) पदे मंजूर आहेत. त्यापैकी सद्य:स्थितीत ५६० ग्रामपंचायत अधिकारी कार्यरत आहेत. कार्यरत ग्रामपंचायत अधिकाऱ्यांपैकी ५१२ ग्रामपंचायत अधिकारी हे संबंधित ग्रामपंचायतीच्या मुख्यालयी वास्तव्य करुन राहत असल्याचा ग्रामसभेचा ठराव गट विकास अधिकारी यांचे मार्फत जिल्हा परिषद प्रशासनास सादर केला आहे. कार्यरत पैकी ४० ग्रामपंचायत अधिकारी हे नवनियुक्त आहेत. साधारणत: ०८ ग्रामपंचायत अधिकारी मुख्यालयी राहत नसल्याचे निदर्शनास आले असून त्यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करणेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या जलसंधारण विभागामार्फत सिमेंट बंधाऱ्यांच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१७) * १०७५ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय कृषी योजनेतंर्गत जलसंधारण विभागामार्फत छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद व कृषी विभागाने सन २०११ ते २०१६ या वर्षांत बांधलेल्या ३६४ सिमेंट बंधाऱ्यांची कामे पुन्हा केल्याचे दाखवून नवीन बनावट देयके सादर करुन शासनाची फसवणूक केली असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त गैरव्यवहारात चार कंत्राटदारांचा समावेश असल्याबाबतचा अहवाल तत्कालीन अधीक्षक अभियंता यांनी शासनाकडे सादर करूनही त्यावर अद्याप शासनाने आपला अभिप्राय दिला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर गैरव्यवहार प्रकरणी अभिप्राय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच संबंधित दोषी ठेकेदार व अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) अंशत: खरे आहे.

तक्रार झालेल्या ३६४ कामांपैकी ६१ कामांची तपासणी प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी केली असून ११ कामांमध्ये द्विरुक्ती आढळून आलेली असल्याचे शासनास कळविले आहे. उर्वरित कामांची तपासणी दक्षता पथकाकडून सुरू आहे. प्रश्नांकित ३६४ कामांपैकी कोणत्याही कामासाठी अद्याप निधीचे वितरण करण्यात आलेले नाही.
(२), (३) अंशत: खरे आहे,

अधीक्षक अभियंता (दक्षता पथक) यांच्या अहवालामध्ये चार कंत्राटदारांच्या नावाचा समावेश असल्याचा उल्लेख आढळून येत नाही. तथापि, दक्षता पथकाच्या अहवालानुसार ज्या कामांमध्ये बनावट देयके सादर करून शासनाची फसवणूक करण्यात आली आहे, अशा कामांशी संबंधित अधिकारी/कर्मचारी व कंत्राटदार यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना निर्देश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: पालघर जिल्हा शासकीय रुग्णालयांमध्ये सोनोग्राफीची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१८) * ११४० श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध शासकीय रुग्णालयांमध्ये विशेषत: पालघर जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये सोनोग्राफीची सुविधा उपलब्ध नसल्याने गरीब गर्भवती मातांना त्यासाठी खाजगी दवाखान्यात रुपये ८००/- ते १०००/- इतका खर्च करावा लागत असून रुग्णालयांमध्ये प्रसुतीसाठी आलेल्या महिलांना सोनोग्राफीशिवाय दाखल करुन घेतले जात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गरोदर मातांना प्रसुतीच्या काळात जननी सुरक्षा योजना व जननी शिशु सुरक्षा योजनेंतर्गत रुपये ५१००/- इतके जमा करण्याचे आदेशित असतानाही सदर लाभार्थी मातांना मागील वर्षांपासून त्याच्या खात्यात सदर रक्कम जमा न झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील विविध शासकीय रुग्णालयांमध्ये तसेच विशेषत: पालघर जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये सोनोग्राफीची सुविधा उपलब्ध होण्याकरीता तसेच गर्भवती महिलांच्या खात्यात जननी सुरक्षा योजना तसेच जननी शिशु सुरक्षा योजनेतंर्गत रक्कम जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच लाभार्थी गर्भवती मातांच्या खात्यात अद्याप रक्कम जमा न करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

पालघर जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालय डहाणू, कासा व जव्हार तसेच ग्रामीण रुग्णालय मोखाडा, पालघर व वाडा या संस्थेमध्ये मोफत सोनोग्राफी करण्यात येते.

(२) व (३) हे खरे नाही.

पालघर जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये अनुसूचित जाती व जमाती व बीपीएल कार्डधारक मातांना प्रसूती पश्चात जननी सुरक्षा योजनेंतर्गत शहरी भागातील रहिवाशी असल्यास रुपये ६००/- व ग्रामीण भागातील रहिवाशी असल्यास ७००/- याप्रमाणे आर्थिक लाभ दिला जातो.

तसेच जननी शिशु सुरक्षा योजनेंतर्गत रुपये ५१००/-लाभार्थीला दिले जात नसून सदर मातेला मोफत आहार, औषधोपचार व संदर्भ सेवेसाठी रुग्णवाहिका दिली जाते. त्यामुळे लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये पैसे जमा होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ससून रुग्णालयात (जि.पुणे) हिमोफिलिया औषधांचा पुरवठा नियमित करण्याबाबत

**(१९) * ११४९ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत हिमोफिलिया आजाराच्या रुग्णांसाठी औषधांचा पुरवठा करणाऱ्या ३६ केंद्रांमध्ये बी.जे.मेडिकल कॉलेज तथा ससून रुग्णालयाचा समावेश असून सद्य:स्थितीत निधी नसल्यामुळे ससून रुग्णालयास शासनाकडून औषधांचा पुरवठा बंद होणार असून, या औषधांअभावी रुग्णांची गैरसोय होणार असल्याबाबत राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सहायक संचालकांनी वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन विभागाला पत्र दिले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ससून रुग्णालयास अँटिहिमोफिलिक घटक (इंजेक्टेबल्स) खरेदी करण्यासाठी दिलेला निधीही यापुढे दिला जाणार नाही तसेच ससून हे तृतीयक रुग्णालय (टर्शरी केअर) असल्याने वैद्यकीय महाविद्यालयांसाठी घटकांची शिफारस केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने हिमोफिलिया या रक्ताशी संबंधित दुर्मिळ आजाराच्या रुग्णांसाठी औषधे मिळण्याकरीता तसेच ससून रुग्णालयास औषंधाचा पुरवठा नियमित होण्याकरीता कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर रुग्णालयाला हिमोफिलिया औषधांचा पुरवठा नियमित करण्याबाबत राज्य शासनाकडून केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील जल जीवन मिशन योजनेंतर्गतची कामे निधीअभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२०) * १३०८ श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील केंद्र शासनाच्या जल जीवन मिशन योजनेंतर्गतच्या १ हजार ४२२ योजनांपैकी ८२० योजना पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषदेकडे निधी शिल्लक नसल्याने संबंधित कंत्राटदारांना केलेल्या कामांच्या देयकांच्या रकमा अदा न केल्यामुळे जल जीवन मिशन योजनेची कामे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधीची मागणी करुनही पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध झाला नसल्यामुळे जिल्ह्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांतील नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नसून पाणी विकत घ्यावे लागत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यातील उक्त योजनांना निधी देण्याबाबत व 'हर घर नल से जल' ची कामे पूर्ण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच सन २०२४ अखेर पर्यंत योजना पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असताना त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

जल जीवन मिशन योजनेंतर्गत पाणीपुरवठा योजनेची कामे निधी अभावी संथ गतीने सुरु आहेत.

(२) हे खरे नाही.

रायगड जिल्ह्यात पाणी टंचाई मुळे टंचाई कार्यक्रमांतर्गत टँकर लागल्याची बाब सद्य:स्थितीत नाही. तरी सन २०२४-२५ करीता एकूण २७६ गावे व ७४० वाड्यांचा ५६२.६८ लक्ष इतका संभाव्य टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.

(३) सद्य:स्थितीत केंद्र शासनाकडून पहिल्या हप्त्याचा तिसरा भाग अप्राप्त आहे. सदर हिस्सा प्राप्त होण्यापुर्वीच शासनस्तरावरुन जल जीवन मिशनयोजनेंतर्गत सुरु असलेल्या कामांमध्ये अडथळा येवू नये याकरीता विशेषबाब म्हणून राज्य हिश्श्याचा निधी राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांना माहे- फेब्रुवारी, २०२५ मध्ये वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सिकलसेल आजारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत

**(२१) * १६२५ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सिकलसेल नियंत्रण कार्यक्रम सन २००८ पासून २१ जिल्ह्यात राबविण्यात येत असून सद्य:स्थितीत १९,२६४ सिकलसेलचे रुग्ण व १,४६,४१० सिकलसेल वाहकांची संख्या आढळून आली असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जास्तीत जास्त नागरिकांनी आपली सिकलसेलची रक्त तपासणी आपल्या जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रामध्ये जाऊन करण्याचे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाने केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात सिकलसेल या गंभीर व जीवघेण्या आजाराच्या रुग्णांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून या आजाराबाबत जनतेत जागरुकता निर्माण करुन या आजारावर नियंत्रण आणण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) १) राष्ट्रीय सिकलसेल निर्मुलन मिशन अंतर्गत ० ते ४० वयोगटातील अंदाजे ५५ लक्ष व्यक्तींची सिकलसेल बाबत तपासणी करण्यात आली आहे.
२) शाळा व कॉलेजमधील विद्यार्थ्यांची विवाहपूर्व तपासणी करुन समुपदेशन करण्यात येत आहे.
३) गरोदर मातांची HPLC तपासणी करण्यात येत आहे.
४) सिकलसेल रुग्ण व वाहक यांचे आजाराबाबत समुपदेशन करण्यात येत आहे.
५) सिकलसेल दिवस दिनांक १९ जून रोजी व सिकलसेल सप्ताह (डिसेंबर दिनांक ११ ते १७ दरम्यान) सर्व जिल्ह्यांमध्ये साजरा करुन तपासण्या व समुपदेशन करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गेवराई पायगाव (ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील जल जीवन मिशन योजनेंतर्गत कामे पूर्ण करण्याबाबत

**(२२) * १७६० श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे गेवराई पायगाव (ता.फुलंब्री,जि.छत्रपती संभाजीनगर) येथील जल जीवन मिशन योजनेचे सन २०२०-२१ मध्ये सुरू झालेले काम अद्यापपर्यंत पूर्ण न झाल्याने या गावच्या सरपंचांनी महिलेचा पोशाख धारण करत डोक्यावर घागर घेऊन गावाला पाणी देण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यालयासमोर अनोखे आंदोलन केले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेवराई पायगाव (ता.फुलंब्री) येथील जल जीवन मिशन योजनेचे काम प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत तसेच सदरहू कामे तात्काळ पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, राज्यातील सर्व गावांमधील जल जीवन मिशन योजनेंतर्गत कामांचा आढावा घेऊन उन्हाळ्याआधी अपूर्ण योजना पूर्ण करून नागरिकांना फिल्टरचे शुध्द पाणी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) गेवराई पायगांव, ता.फुलंब्री गावातील जल जीवन मिशनच्या कामातील मूळ मंजूर अंदाजपत्रकामध्ये असलेल्या स्त्रोतास गावकऱ्यांचा विरोध असल्यामुळे नविन स्त्रोताची निश्चिती करण्यात आली. तसेच, नविन स्त्रोताच्या मंजुरीनंतर त्या स्त्रोताच्या कामासही स्थानिकांचा विरोध असल्यामुळे योजना पूर्ण करण्यास विलंब झाला आहे. सद्य:स्थितीत योजनेची विहिर उध्दरण वाहिनी, जलकुंभ, वितरण व्यवस्था, नळजोडण्या इत्यादी कामे पूर्ण झाली असून पंपाचा पुरवठाही करण्यात आलेला आहे. तसेच वीज जोडणी प्राप्त करणेसाठी संबंधितांना कामाचे कार्यादेश देण्यात आले असून वीज जोडणीची कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्यात जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत एकूण ४३,१०८ योजनांची कामे मंजूर असून १४,८८६ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत व उर्वरीत योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उसगांव (ता.वसई, जि.पालघर) येथील कब्जे वहिवाटीच्या जागेतून ग्रामपंचायतीने विनापरवानगी रस्ता बनविल्याबाबत

**(२३) * १७९० ॲड.अनिल परब, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उसगांव (ता.वसई, जि.पालघर) येथील सरपंच व ग्रामसेवक यांनी परस्पर एका खाजगी कंपनीकडून मोठ्या प्रमाणात पैसे घेऊन सर्व्हे क्र.११९/२ व ३३/२ या व अन्य कब्जे वहिवाटीच्या शेतजमिनीत विनापरवानगी व अनधिकृतपणे भरणी करुन ४० मीटर लांबीचाचा डांबरी रस्ता बनविला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या रस्त्यांबाबत शासकीय कार्यपध्दतीनुसार भूसंपादनाची कार्यवाही झालेली नसल्याने याबाबत संबंधित जमीन मालकांनी महसूल कार्यालयात तसेच मा.ग्रामविकास मंत्री याचे कार्यालयाकडे लेखी निवेदनाद्वारे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार करूनही त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनधिकृतपणे तयार केलेल्या रस्त्यामुळे शेत जमिनीच्या झालेल्या नुकसानीबाबत ग्रामपंचायत उसगांव अथवा खाजगी कंपनीकडून शेतजमीन मालकांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच जमिनीच्या मालकांची परवानगी ना घेता अनधिकृतपणे ४० मीटर लांबीचा रस्ता बनविणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) नाही, हे खरे नाही.

सदर ठिकाणी करण्यात आलेला रस्ता स.नं.१२० मधून ते स नं.३३/२ या जागेतून तयार करणेत आलेला आहे. सदर रस्ता खाजगी यंत्रणेने व संबंधित जमीन मालक/शेतमालक यांनी स्वखर्चाने व सामाईकरित्या तयार केलेला आहे. या रस्त्यासाठी कोणत्याही प्रकारचा शासकीय निधी अथवा ग्रामपंचायतीचा निधी खर्च करण्यात आलेला नाही.

(२) नाही, हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ताडाळी व धानोरा-वढ (जि.चंद्रपूर) येथील औद्योगिक वसाहतीतील धारीवाल औष्णिक वीज प्रकल्पावर कारवाई करण्याबाबत

**(२४)** * **१९९४ श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ताडाळी (जि.चंद्रपूर) येथील औद्यागिक वसाहतीतील धारीवाल औष्णिक वीज प्रकल्पाकरीता बांधण्यात आलेल्या जलाशयातील पाणी झिरपून आजूबाजूच्या शेतांमध्ये शिरत असून आवश्यकतेपेक्षा जास्त पाणी शेतात जमा होत असल्याने शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्धा नदीवरील धानोरा-वढा (जि.चंद्रपूर) येथे नदीच्या मध्यभागी इंटेक वेल निर्माण करून नदी पात्रातून शेतकऱ्यांच्या वाट्याला जाणारे पाणी धारीवाल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी वापरत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जलाशयातील पाणी झिरपून आजूबाजूच्या शेतांमध्ये शिरत असल्याने आवश्यकतेपेक्षा जास्त पाणी शेतात जमा होत असल्याने शेतपिकांचे उक्त कंपनीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्यामुळे पिडीत शेतकऱ्यांना शेतपिकाच्या बाजारभावानुसार नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने धारीवाल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

ताडाळी (जि.चंद्रपूर) येथील औद्योगिक वसाहतीतील मे. धारीवाल औष्णिक वीज प्रकल्पाकरीता असलेल्या जलाशयातील पाणी झिरपून आजूबाजूच्या शेत पिकांचे नुकसान होत असल्याची कुठलीही तक्रार माहे फेब्रुवारी, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास महामंडळास प्राप्त झाली नाही.
(२) व (३) मऔवि महामंडळाकडून ताडाळी (जि.चंद्रपूर) विकास केंद्रातील भूखंड क्र.C-६,७ ८ आराजी १७,८८,०० चौ.मी. हेक्टर क्षेत्र मे.धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर लि. कंपनीला ६०० mw पॉवर प्रोजेक्ट करीता वितरीत करण्यात आला आहे.

तथापि, मे.धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर लि. कंपनीला मऔवि महामंडळातर्फे पाणीपुरवठा करण्यात येत नाही. सदर कंपनीला औद्योगिक वापरासाठी जलसंपदा विभागाकडून स्वतंत्ररित्या १४ द.ल.घ.मी. वार्षिक पाणी आरक्षण मंजूर असून, दरवर्षी अंदाजे ९.५ द.ल.घ.मी चा वार्षिक पुरवणी करारनामा जलसंपदा विभागाकडून परस्पर करण्यात येतो. मे. धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी पाणीपुरवठा करीता वर्धा नदीवरुन स्वतंत्र पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केलेली असून, पाणी उचल करणेकरीता मौजा धानोरा येथे रेडीयल वेल बांधण्यात आलेली आहे.

मऔवि महामंडळाकडे महसूल विभाग, चंद्रपूर यांचेकडून प्राप्त माहितीनुसार मे.धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी सन २०१८-१९,२०१९-२० व २०२०-२१ या तीन वर्षाकरीता येणारी नुकसान भरपाईची रक्कम रुपये ९,८१,१८८/- दिनांक १४/०७/२०२३ रोजी धनाकर्षाव्दारे नायब तहसिलदार यांना अदा केली आहे. तसेच सन २०२१-२२ व २०२२-२३ करीता तालुका कृषी अधिकारी, चंद्रपूर यांचेमार्फत

अनुक्रमे रक्कम रुपये १४,२४,४४५/- व रुपये १५,४५,७५०/- नुकसान भरपाई अदा केली असून, संबंधित शेतकऱ्यांनी त्यांना नुकसान भरपाई मिळाली असून, याबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे लिहून दिले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मृद व जलसंधारण महामंडळातील मुख्य व लेखा वित्त अधिकारी पद रिक्त असल्याबाबत

**(२५) * २१८६ श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मृद व जलसंधारण महामंडळात गेल्या पंचवीस वर्षांपासून मुख्य व लेखा वित्त अधिकारी (कॅफो) हे पद हेतुपुरस्सर रिक्त ठेवण्यात आले असून या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार हा कार्यकारी अभियंता यांच्याकडे नियमबाह्यरित्या देण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी ठेकेदारांची देयके काढणारी व त्यावर नियंत्रण ठेवणारे मुख्य व लेखा वित्त अधिकारी (कॅफो) ह्या पदाचा व कार्यकारी अभियंता या दोन्ही पदाचा कार्यभार एकाच व्यक्तीकडे असल्यामुळे या विभागातील कामे निकृष्ट व नियमबाह्यरित्या होत असून त्यात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन मृद व जलसंधारण महामंडळात मुख्य व लेखा वित्त अधिकारी (कॅफो) हे पद तात्काळ भरण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) मुख्य लेखा व लेखा परीक्षा अधिकारी (कॅफो) यांची वित्त विभागाच्या आदेशाने दिनांक ३१/०८/२०२४ अन्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे पदस्थापना करण्यात आल्याने मुख्य लेखा व लेखा परीक्षा अधिकारी (कॅफो) चे पद रिक्त झाले आहे. अद्याप नव्याने नेमणूक करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत

**(२६) * ८९८ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या दिनांक ७ मार्च, २०२४ रोजीच्या अधिसूचनेन्वये ग्रामविकास विभागातंर्गत जिल्हा परिषदांमधील कनिष्ठ सहाय्यक या पदावर पदोन्नतीने अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसह नामनिर्देशनाने व वाहनचालकांमधून ४०:५०:१० असे प्रमाण निश्चित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामविकास विभागाचे आस्था-७ कार्यासनाचे पत्र क्रमांक सेप्रनि-२०२८/प्र.क्र.१६२/आस्था-७, दिनांक ११ मार्च, २०२४ नुसार राज्यातील जिल्हा परिषदांकडील सुधारणेच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करावी असे राज्यातील सर्व विभागीय आयुक्त व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळविण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्याप राज्यातील बहुतांश जिल्हा परिषद कार्यालयांमध्ये या अधिनियमाची पूर्णत: अंमलबजावणी करून बिंदूनामावली करण्यात आलेली नसल्याने पदोन्नतीच्या प्रतिक्षेत असलेले हजारो कर्मचारी हे त्यांच्या न्याय हक्काच्या पदोन्नतीपासून वंचित राहिल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी राज्यातील सर्व जिल्हा परिषदांकडून तातडीने व विशिष्ट कालमर्यादेत कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना सूचना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, त्याचा तपशील काय आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत व याप्रकरणी तातडीने कार्यवाही करून पदोन्नतीच्या प्रतिक्षेत असलेल्या हजारो जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना न्याय देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) शासनाच्या दिनांक ७ मार्च, २०२४ रोजीच्या अधिसूचनेनुसार पालघर, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, नाशिक,नंदुरबार,जळगाव,अहिल्यानगर, पुणे,सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छ.संभाजीनगर, परभणी, धाराशीव, लातूर, अमरावती, वाशिम, यवतमाळ, भंडारा, गोंदिया व गडचिरोली या २२ जिल्हा परिषदांनी पदोन्नती बाबतची कार्यवाही केली आहे.

ठाणे, रायगड, नांदेड, अकोला, नागपूर, हिंगोली व बीड या ०७ जिल्हा परिषदांमध्ये पदोन्नतीबाबतची कार्यवाही सुरु आहे.

धुळे, जालना, वर्धा, चंद्रपूर व बुलढाणा या ०५ जिल्हा परिषदांमध्ये बिंदू नामावली अद्ययावत करण्याचे काम सुरु असल्यामुळे पदोन्नतीची कार्यवाही झालेली नाही. बिंदू नामावली अद्यायवत करण्याची कार्यवाही सुरु असून ती पूर्ण होताच पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण होईल.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सार्वजनिक व खाजगी रूग्णालयांचे अग्निसुरक्षा मुल्यांकन करण्याबाबत

**(२७) * ५५१ श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोविड काळात भंडारा येथील रूग्णालयांला आग लागून ११ नवजात बालकांचा आगीत होरपळून मृत्यू झाल्याची घटना घडल्यानंतर राज्यातील सर्व रुग्णालयांना फायर ऑडिट करण्यासंदर्भात विभागाने आदेश दिले असून अद्यापपर्यंत राज्यातील बहुतांश रुग्णालयांनी फायर ऑडीट केले नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी १० महिन्यांच्या कालावधीत राज्यातील ६ रूग्णालयांना आग लागून त्यात एकूण ५५ जणांचा मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले असून शासनाने राज्यातील सर्व रुग्णालयांचे फायर ऑडिट करण्याच्या घेतलेल्या निर्णयानुसार आत्तापर्यंत किती रुग्णालयांनी फायर ऑडिट केले आहे,
(३) असल्यास, उक्त निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच दोषी रुग्णालये व त्यांच्या व्यवस्थापनेवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित असलेल्या रुग्णालयांमध्ये गेल्या १० महिन्याच्या कालावधीत आग लागण्याची घटना घडलेली नाही.

शासनाने राज्यातील सर्व रुग्णालयांचे फायर ऑडीट करण्याच्या घेतलेल्या निर्णयानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित कार्यरत ५१९ रुग्णालयांपैकी ५१६ रुग्णालयांचे फायर ऑडीट करण्यात आलेले आहे. तसेच उर्वरित ३ रुग्णालये ही भाड्याच्या जागेत कार्यान्वित असून सदरहू रुग्णालयात पुरेशी अग्निशमन उपकरणे उपलब्ध आहेत.
(३) राज्यातील रुग्णालयांतील अग्निसुरक्षेच्या बाबत प्रभावी अंमलबजावणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित रुग्णालयांचे फायर ऑडीट करुन त्यामध्ये अग्निशमन यंत्रणा उभारणीसाठी जिल्हा वार्षिक योजना व राज्य स्तरावरुन निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असून त्यांचे अग्निशमन यंत्रणा उभारणे, प्रतिबंधात्मक विद्युत परिक्षण करणे, त्यासाठी स्वतंत्र नोडल अधिकारी यांची नियुक्ती, रुग्णालयातील विद्युत भार तपासून त्यादृष्टीने कार्यवाही करणे, सार्वजनिक बांधकाम विभाग, अग्निशमन विभाग इ. विभागांबरोबर समन्वय बैठका, रुग्णालयातील अधिकारी कर्मचारी यांना अग्निसुरक्षा बाबत नियमित प्रशिक्षण (मॉकड्रील्स) बाबत सुचना, वैद्यकीय उपकरणांचे Preventive Maintenance व अग्निशमन यंत्रणा उभारुन अग्निशमन ना-हरकत प्रमाणत्र प्राप्त करुन घेणे याबाबत नियमित सुचना देण्यात येत असून त्याबाबत आढावा घेण्यात येत आहे. तसेच रुग्णालयांच्या अग्निसुरक्षा बाबत केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या विविध मार्गदर्शक सुचना सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

खाजगी रुग्णालयांच्या बाबत खाजगी रुग्णालयांना मुंबई नर्सिंग होम कायदा १९४९ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र/पुनर्नोंदणी प्रमाणपत्र, अग्निसुरक्षा बाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त असल्याशिवाय देण्यात येऊ नये अशा सुचना संबंधित नोंदणी प्राधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२८) * ४०१ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.विक्रांत पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मंजूर ३ हजार ४३२ पदांपैकी २ हजार १२० पदे भरलेली असून उर्वरित पदे रिक्तअसल्याची बाब राज्याच्या लेखापरीक्षणात माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून राज्यात जिल्हा रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, पॅरा मेडिकल स्टाफची तसेच निमवैद्यकीय कर्मचारी यांची मोठ्या प्रमाणात कमतरता असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय सार्वजनिक स्वास्थ्य मापदंडानुसार बाह्यरुग्ण विभागामध्ये एका वैद्यकीय अधिकाऱ्याने किमान ४० रुग्ण तपासणे बंधनकारक आहे परंतु वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे किमान ८० रुग्णांना तपासावे लागत आहे तसेच रुग्णालयातील जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्नित रुग्णालयांमध्ये जनरल मेडिसिन, सर्वसामान्य शस्त्रक्रिया, दंतविशेषतज्ञ बाह्य रुग्ण विभागात तज्ञांची कमतारता असल्याने उर्वरित कर्मचाऱ्यांवरही कामाचा अतिरिक्त भार पडत असल्याने रुग्णांना वेळेवर वैद्यकीय उपचार आणि सुविधा मिळत नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रुग्णालयास अचानक भेटी देऊन रुग्णालयातील स्वच्छता, आहाराचा दर्जा, रुग्ण आणि रुग्णांच्या नातेवाईकांना मिळणारी वागणूक, औषधांची उपलब्धता, बाहय संस्थेद्वारे नेमलेल्या कर्मचाऱ्यांना मिळणारे मानधन तेथील सोयीसुविधा, गैरसोयी याबाबतची पाहणी करण्याचे निर्देश देखील मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील आरोग्य यंत्रणा सुधारण्यासाठी व रिक्त पदे भरण्यासाठी तसेच रुग्णांना आवश्यक वैद्यकीय उपचार व सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांची(एस-२३) व त्यावरील वरिष्ठ पदे एकूण १८०७ मंजूर आहेत. त्यापैकी १०२७ पदे भरलेली असून ७८० पदे रिक्त आहेत.

वैद्यकीय अधिकारी गट-अ (एस-२०) यांची ८६१० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ७८१० पदे भरलेली असून ८०० पदे रिक्त आहेत. सदर ७८१० पदांमध्ये नियमित-६२१५, कंत्राटी-१२८२, बंधपत्रित-३१३ वैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

परिचारिका संवर्गात १०५४४ पदे मंजूर असून ९००८ पदे भरलेली आहेत.तसेच निमवैद्यकीय कर्मचारी व तंत्रज्ञ यांची १७७५६ पदे मंजूर असून १३४१४ पदे भरलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

केंद्रशासनाच्या IPHS-२०२२ च्या मार्गदर्शक सुचनांनुसार जिल्हा रुग्णालयात एका वैद्यकीय अधिकाऱ्याने ७५ बाह्यरूग्ण, विशेषज्ञांमध्ये जनरल मेडिसीन व सर्जरी यांनी ६० बाह्यरूग्ण, दंतचिकित्सक यांनी २० बाहयरूग्ण तपासावे, असे नमूद आहे.

(३) हे खरे आहे.

(४) संचालक मुंबई हे पद म.लो.आ. च्या शिफारशीनुसार भरण्यात आले आहे. उपसंचालक संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील १२ पदे व पदोन्नतीच्या कोट्यातील ०९ पदे भरण्यात आली आहेत. तसेच, जिल्हा शल्य चिकित्सक संवर्ग, जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्ग, विशेषज्ञ संवर्गातील २२६ पदे पदोन्नतीने भरण्यात आली आहेत. जिल्हा शल्य चिकित्सक संवर्ग, जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्ग, विशेषज्ञ संवर्गातील अनुक्रमे २२५, ३३, ९५ पदांची जाहिरात म.लो.आ. ने माहे डिसेंबर, २०२४ व जानेवारी, २०२५ मध्ये प्रसिध्द केली आहे. पदोन्नतीच्या कोट्यातील पदे पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

वैद्यकीय अधिकारी गट-अ (एस-२०) ची १७२९ रिक्त पदे भरण्याची जाहिरात दिनांक ३१/०१/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार संबंधित उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

राष्ट्रीय आरोग्य अभियांनातर्गत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून १० वर्षे व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या उमेदवारांचे समावेशन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

एम.बी.बी.एस. अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना सामाजिक दायित्व सेवा अनिवार्य केलेली असून सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत सदर उमेदवारांना बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात येते.तसेच, वैद्यकीय अधिकारी गट-अ व गट-ब च्या रिक्त पदांवर जिल्हा निवड मंडळामार्फत कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करून वैद्यकीय सेवेमध्ये अडथळा होणार नाही याची वेळोवेळी दक्षता घेण्यात येते.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्त कार्यरत गट- क व गट-ड संवर्गातील १०९४९ रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सन २०२४ मध्ये सदर भरती प्रक्रियेतून गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या ९६१८ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे.

मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व आरोग्य उपसंचालक व कार्यक्रम प्रमुखांसमवेत झालेल्या बैठकीमध्ये स्वच्छता सेवा, भोजन व्यवस्था, औषध उपलब्धता, वैद्यकीय सुविधा आणि सुसंवाद करण्याबाबत दिलेल्या सुचनांनुसार आायुक्तालयाचे स्तरावरून दिनांक ३०/०१/२०२५ च्या परिपत्रकान्वये तशा सूचना सर्व संबधितांना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच कुशल व अकुशल पदे बाह्ययंत्रणेव्दारे भरण्याकरीता दिनांक २५ जुलै, २०२४ व १० सप्टेंबर,२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार निविदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२९) * ४५४ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रुग्णालयात मनुष्यबळ अभावी आरोग्य सेवेत मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण झाल्या असून सध्या जिल्ह्यात आरोग्य सेवेत मंजूर असलेल्या ५३१ पदांपैकी केवळ २०४ पदे भरली असून उर्वरित रिक्तपदांमुळे रुग्णालयातील कर्मचाऱ्यांवरही कामाचा अतिरिक्त भार पडत असल्याने रुग्णांना वेळेवर सोयी सुविधा मिळत नसल्याने त्यांची गैरसोय होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली येथील जिल्हा रुग्णालयात सध्या फक्त ४ डायलिसिस मशीन असून या मशिनवर २३ रुग्ण उपचार घेत असून उर्वरित अन्य नोंदणीकृत डायलिसिसचे २४ रुग्ण असून त्यांना खासगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागत असल्याने त्यांना आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त रुग्णालयात अधिक डायलिसिस मशीन उपलब्ध करुन देणेबाबत, रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा वेळेवर उपलब्ध होणेबाबत तसेच शासकीय रुग्णालयातील रिक्त पदांचा आढावा घेऊन सदरील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

हिंगोली जिल्ह्यातील आरोग्य विभागातील वर्ग-१ ते वर्ग-४ संवर्गातील एकूण ६४८ पदे मंजूर आहेत. सन २०२३-२४ च्या पदभरतीत त्यापैकी १६८ पदे भरण्यात आली असून एकूण ५३० पदे भरलेली आहेत. सद्य:स्थितीत ११८ पदे रिक्त आहेत. तथापि, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत मनुष्यबळाचे योग्य नियोजन करून रुग्णांना सोयी सुविधा पुरविण्यात येतात.
(२) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय, हिंगोली येथे एकूण ०४ डायलिसिस मशीन उपलब्ध असून त्यापैकी १ मशीन हिपॅटायटीसच्या रुग्णांकरीता राखीव ठेवण्यात आली आहे. उर्वरीत ०३ मशीनवर दररोज दोन शिफ्टमध्ये डायलिसिस सेवा पुरविण्यात येते.

सध्या जिल्हा रुग्णालयात एकूण २३ रुग्ण उपचार घेत असून उर्वरित नोंदणीकृत डायलिसिसचे २४ रुग्ण हे ज्या खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत त्याठिकाणी रुग्णांना MJPJAY या योजनेचा लाभ उपलब्ध करून देण्यात आला असून त्यांतर्गत रुग्णांवर मोफत उपचार करण्यात येतात.
(३) हिंगोली जिल्ह्यात रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्याच्या दृष्टीने बाहयंत्रणेमार्फत डायलिसिस सेवा पुरविण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आलेला आहे. त्यांतर्गत ग्रामीण रुग्णालय, औंढा नागनाथ येथे डायलिसिस सेंटर सुरु झाले आहे. तसेच इतरही उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयांमध्ये आरोग्य संस्था स्तरावर डायलिसिसची सेवा उपलब्ध होणार आहे.

सन २०२३-२०२४ या वर्षात गट-क व गट-ड संवर्गातील पदभरती प्रक्रिया राबविण्यात आली असून पात्र उमेदवारांमधून एकूण ९०५३ रिक्त पदे भरण्यात आली असून त्यापैकी हिंगोली जिल्ह्यात १६८ रिक्त पदे भरण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील सौर ऊर्जेवर आधारित उपसा-सिंचन योजना सुरु करण्याबाबत

**(३०) * २३० डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील निलज बुज येथे ३० मे,२०१९ रोजी सौर ऊर्जेवर आधारित रुपये १.५५ कोटी एवढ्या रकमेच्या खर्चाच्या उपसा सिंचन योजनेचा तत्कालीन लोकप्रतिनिधींच्या हस्ते शुभारंभ झाला होता परंतु प्रत्यक्षात ही योजना कार्यान्वित झाली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना कार्यान्वित न झाल्याने १०० हेक्टरपेक्षा अधिक कोरडवाहू शेती सिंचनापासून वंचित राहिली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना कार्यन्वित न होण्याची कारणे तसेच सौरऊर्जा उपसा-सिंचन योजनेची पायाभरणी होऊन पाच वर्षांचा कालावधी होऊनही अद्यापपर्यंत प्रलंबित असलेली सौर ऊर्जेवर आधारित १.५५ कोटी खर्चाची उपसा-सिंचन योजना तात्काळ सुरू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) होय, खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर योजनेकरीता शासन निधी अंतर्गत शासन निर्णय दिनांक १४/०८/२०१८ अन्वये एकूण रुपये १,५५,८५,७१३/- ची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले. तथापि, सदर योजनेच्या Rising Main च्या संरेखेत खाजगी मालकीची जमीन असल्यामुळे शेतकऱ्यांनी आंदोलन करुन काम करुन देण्यास अडथळा केल्यामुळे सदर काम थांबविण्यात आले. त्यामुळे सदर कामाचे करारनामा रद्द करण्यात आला.

तसेच सदर प्रकल्पाच्या Rising Main चे संरेखेत (Alignment मध्ये) बदल झाल्याने प्रकल्पाच्या संकल्पन व रेखाचित्रामध्ये होणाऱ्या बदलानुसार सदर कामाचे नव्याने अंदाजपत्रक तयार करण्यात आलेली असून महाव्यवस्थापक, महाऊर्जा कार्यालय, भंडारा यांचेकडून सौर पॅनेलचे अंदाजपत्रक प्राप्त करुन घेऊन अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

-----------------

## मानखुर्द चिल्ड्रन्स एड सोसायटीच्या बालसुधारगृहाच्या जागेवर अतिक्रमण केल्याबाबत

**(३१) * १७४ श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील महिला व बालविकास विभागातंर्गत आरक्षित असलेल्या मानखुर्द चिल्ड्रन्स एड सोसायटीच्या बालसुधारगृहाच्या २५ एकर जागेवर येथील स्थानिकांनी अनधिकृत दुकाने, बार, मंगल कार्यालये आणि गॅरेजचे बांधकाम केले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अनधिकृत गाळे आणि कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांमुळे या भागात असलेल्या भारताच्या प्रमुख अनूसंशोधन संस्थेच्या (बी.ए.आर.सी.) सुरक्षेस धोका निर्माण झाल्याने मुख्याधिकारी, दि चिल्ड्रेन एड सोसायटी, मुंबई यांनी महिला व बालविकास विभागाचे संबंधित अधिकारी, मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर आणि स्थानिक पोलीस ठाणे यांच्याकडे निवेदनाद्वारे कारवाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासाठी तसेच या जागेवर पुन्हा अनधिकृत बांधकाम होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

दि चिल्ड्रेन्स एड सोसायटीच्या बालसुधारगृहाच्या ५५ एकर ४ गुंठे ४ आणे जमिनी पैकी २३ एकर जमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असून तेथे मद्याची दुकाने, गॅरेज, बार, गोदाम, मंगल कार्यालय, झोपड्या अस्तित्वात असल्याचे दिसून येत आहे.
(२) होय, अंशत: खरे आहे.

अनधिकृत गाळे आणि कारखाने यावर कार्यवाही करण्यास मागणी केलेली आहे. परंतु, अनुसंशोधन संस्थेच्या (बी.ए.आर.सी.) सुरक्षेच्या संदर्भात या विभागाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झाली असल्याचे दिसून आले नाही.
(३) सोसायटीच्या मानखुर्द येथील अतिक्रमणाखालील व शासन जमा झालेल्या ९८३४१.२ चौ. मि. (२४.३०० एकर) जागा पुर्नप्राप्तीसाठी सोसायटीच्या वतीने मा.मंत्री महसूल, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे अपील दाखल केले असून सदर अपील प्रलंबित आहे.

तसेच याव्यतिरिक्त टाटा पॉवर कंपनी लि. यांच्या विद्युत वाहिनीखाली अतिक्रमणे निष्कासीत करण्याकरीता उपजिल्हाधिकारी, (अति/निष्का) चेंबूर, यांनी सहाय्यक आयुक्त, एम/पुर्व प्रभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, गोवंडी, मुंबई यांना नियोजन प्राधिकारी म्हणून कारवाई करण्यास कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात झोमॅटो, झेप्टो, स्वीगीसारख्या खाजगी कंपन्यांतील कर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण व विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(३२) * १४८ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात झोमॅटो, झेप्टो, स्वीगी यांसारख्या खाद्य वितरण करणाऱ्या लोकप्रिय खाजगी कंपन्यामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे कायदेशीर संरक्षण उपलब्ध नसल्याचे तसेच सदरहू कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांना निश्चित असा मोबदला न देता त्यांना १४ तासांच्या प्रहरांमध्ये (शिफ्ट) राबवून घेण्यात येत असल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या खाजगी कंपन्यांतील कर्मचाऱ्यांना योग्य त्या सोई-सुविधा उपलब्ध होण्याकरिता तसेच राज्यात झोमॅटो, झेप्टो, स्वीगीसारख्या खाजगी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या या कर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) सदर प्रकरणाबाबत कोणतीही तक्रार अथवा निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतर्गत प्रलंबित पदभरती करण्याबाबत

**(३३)** * **१८२९ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ अंतर्गत सन २०१९ मध्ये ८०२ पदांच्या भरतीसाठी प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात रद्द करण्यात आली असल्याने तसेच दिनांक १४ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यादरम्यान आयबीपीएस पदभरतीची जाहिरात प्रसिध्द करून उमेदवारांचे अर्ज भरून घेण्यात आलेले असूनही सदरहू परीक्षा अद्यापही घेण्यात आलेल्या नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दोन्ही परीक्षा वेळेत न झाल्यामुळे उमेदवारांचे वय वयोमर्यादेपेक्षा जास्त होत असल्याने हजारो उमेदवार परीक्षा देण्यास अपात्र ठरत असून सदर परीक्षा तात्काळ घेण्याची मागणी विद्यार्थ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ अंतर्गत ८०२ पदांच्या व आयबीपीएस पदांची भरती तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक १४ ऑगस्ट, २०२३ च्या जाहिरातीद्वारे एकूण ३४ संवर्गातील ८०२ पदे भरणेसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. त्यापैकी ११ संवर्गातील ७९ पदांसाठीची (सुधारीत ७६ पदे) परीक्षा दिनांक ३०/०३/२०२४, दिनांक ०२/०४/२०२४ व दिनांक ०३/०४/२०२४ या कालावधीमध्ये घेण्यात आलेली आहे. उर्वरीत २३ संवर्गातील ७२३ पदांच्या (सुधारीत ७१४ पदे) परीक्षा घेणेसाठी मे. आयबीपीएस यांचेकडे पाठपुरावा सुरु आहे.

(२) ज्या उमेदवारांनी दिनांक १४/०८/२०२३ रोजीच्या जाहिरातीनुसार विहित मुदतीत ऑनलाईन परीपूर्ण वैध अर्ज सादर केलेले आहेत. त्या सर्व उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. तसेच, त्यापैकी काही उमेदवारांनी त्यांची परीक्षा घेणेसाठी शासनास ईमेलद्वारे कळविलेले असल्याचे दिसून येत आहे.

(३) दिनांक १४ ऑगस्ट, २०२३ च्या जाहिरातीद्वारे एकूण ३४ संवर्गातील ८०२ पदे भरणेसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. त्यापैकी ११ संवर्गातील ७९ पदांसाठीची परीक्षा दिनांक ३०/०३/२०२४, दिनांक ०२/०४/२०२४ व दिनांक ०३/०४/२०२४ या कालावधीमध्ये घेण्यात आलेली आहे. तद्नंतर महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ नुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षणाबाबतची कार्यवाही दिनांक ३१/०१/२०२५ रोजी पूर्ण करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने, मे. आयबीपीएस यांचेकडे उर्वरीत पदांच्या परीक्षा घेण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. लवकरच उर्वरीत संवर्गांच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंडोरे (ता.जि.पालघर) येथील जिल्हा रुग्णालयाचे काम सुरु करण्याबाबत

**(३४) * २१९४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्याची निर्मिती होऊन जवळपास १० वर्ष इतका कालावधी झाला असला तरी जिल्हा रुग्णालयाचे काम पूर्ण झाले नसल्याने जिल्ह्यातील नागरिकांना मुंबई व गुजरात यालगतच्या शहरातील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी जावे लागत असून जिल्ह्यातील नंडोरे येथे २०० खाटांचे जिल्हा रुग्णालय स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेऊनही सदरहू रुग्णालयाचे काम अद्याप अपुर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्हा रुग्णालयाचे काम ७३ टक्के पूर्ण झाले असून पुढील कामासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध न झाल्याने सदरची कामे अद्याप सुरु झालेली नसल्यामुळे समर्थन संस्थेने मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हाधिकारी पालघर, आरोग्य संचालनालय यांना दिनांक १४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनानुसार गांव पाड्यातील आदिवासींना आरोग्य विषयक सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी नंडोरे येथे २०० खाटांचे जिल्हा रुग्णालयाचे काम सुरु करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

## मुंबईतील जे.जे. रुग्णालयामधील परिचर्या शिक्षण संस्थेच्या प्राचार्य पदावरील नियुक्तीबाबत

**(३५) * १०२६ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जे.जे. रुग्णालयामधील परिचर्या शिक्षण संस्थेच्या प्राचार्यपदी वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापकांची नियुक्ती वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाकडून करण्यात आली असून सदर नियुक्ती भारतीय परिचर्या परिषदेच्या मानांकनानुसार गैर असल्याने त्यास विरोध करत परिचर्या संवर्गातील व्यक्तीचीच सदर संस्थेच्या प्राचार्यपदी नियुक्ती करण्यात यावी या मागणीसाठी संस्थेतील २०० विद्यार्थ्यांनी माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आंदोलनाची दखल घेत संशोधन संचालनालयाचे संचालक यांनी विद्यार्थ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने परिचर्या संवर्गातील व्यक्तीची प्राचार्य म्हणून नियुक्ती करण्याचे मौखिक आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या व त्यांना देण्यात आलेल्या मौखिक आश्वासनाच्या अनुषंगाने सदरहू प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) दिनांक ९/१२/२०२४ रोजीच्या आदेशान्वये परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई या संस्थेच्या प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार परिचर्या संवर्गातील सहाय्यक प्राध्यापक यांच्याकडे देण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रमातंर्गत बालकांवरील शस्त्रक्रियेच्या तपशिलाबाबत

**(३६) * १०७६ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रमाअंतर्गत (आरबीएसके) राज्यातील ० ते १८ वयोगटातील जवळपास २ कोटी बालकांच्या केलेल्या आरोग्य तपासणीत २१६४ बालकांना हृदयाचे आजार असल्याचे दिनांक २१ जानेवारी,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर हृदयविकारग्रस्त बालकांवर अतिशय विलंबाने शस्त्रक्रिया करण्यात येत असून सदरचे आजार अत्यंत गंभीर स्वरुपाचे असल्याने त्याकडे तातडीने लक्ष देवून संबंधित हृदयविकारग्रस्त बालकांवर शस्त्रक्रिया करुन संबंधितांकडे पाठपुरावा करण्यास शासकीय यंत्रणा चालढकल करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हृदयविकारग्रस्त उर्वरित बालकांच्या शस्त्रक्रिया तातडीने करण्यासाठी संबंधित रुग्णालयातील डॉक्टरांकडे पाठपुरावा करुन त्या यशस्वीरित्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) केंद्र शासनाच्या १०४ शस्त्रक्रियेच्या मॉडेल कॉस्टिंग पैंकी ज्या हृदयशस्त्रक्रिया महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) मध्ये समाविष्ट आहेत, त्या हृदय शस्त्रक्रिया महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) अंगीकृत रुग्णालयामधून करण्यात येतात. तर ज्या महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) मध्ये समाविष्ट नाहीत, त्या आरबीएसकेच्या ७० अंगीकृत रुग्णालया मधून पूर्णतः मोफत करण्यात येतात. दरमहा हृदय विकार ग्रस्त बालकांचा आढावा तालुकास्तर, जिल्हास्तर तसेच राज्यस्तरावर दरमहा घेण्यात येतो आणि पाठपुरावा करुन मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशिम जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(३७) * १७९६ श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची देयके त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी पंचायत विभागाने माहिती मागितली होती परंतु सदरहू प्राप्त कागदपत्रांतील काही त्रुटी तसेच प्रशासनाने कर्मचाऱ्यांना दिलेली माहिती ही अपुरी स्वरुपाची असल्याने काही ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात दोन महिन्यांपासून भविष्य निर्वाह निधीची रक्कम जमा होऊ शकली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशिम जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची देयके त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी प्राप्त कागदपत्रांतील त्रृटी तसेच कर्मचाऱ्यांनी दिलेली परिपूर्ण माहिती तयार करुन बँक प्रशासनास सादर करुन कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा करुन संबंधित कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी देयके त्यांना अदा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) होय हे खरे आहे.

(२) सर्व पंचायत समिती स्तरावर निधी वितरीत केला असून, सदर रक्कम संबंधित ग्रामपंचायत कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधीच्या संयुक्त बँक खात्यात जमा करुन अदा करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाडा (जि.पालघर) येथील ग्रामीण रूग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(३८) * १००१ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) येथील ग्रामीण रूग्णालयाचे श्रेणीवर्धन करून ३० खाटांच्या जागी १०० खाटांचे ग्रामीण रूग्णालय उभारण्यास माहे मे, २०२१ मध्ये मान्यता देण्यात आली असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाडा (जि.पालघर) येथे मोठ्या प्रमाणावर आदिवासी पाडे असून या रुग्णालायात येणारे रुग्ण हे दुर्गम भागातून येत असतात, येथील आरोग्य सेवेची परिस्थिती अतिशय गंभीर असूनही अद्याप या ३० खाटांच्या ग्रामीण रूग्णालयाचे १०० खाटांच्या ग्रामीण रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्यात न आल्याने येथील स्थानिक रूग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून त्यांना उपचारासाठी ठाणे, मुंबई, डोंबिवली या ठिकाणी जावे लागत असून त्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ग्रामीण रूग्णालयाचे ३० ऐवजी १०० खाटांच्या ग्रामीण रूग्णालयात श्रेणीवर्धन करून येथील रुग्णांना दिलासा देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय वाडा येथे ३० खाटांचे रुग्णालय कार्यरत असून उपलब्ध मनुष्यबळ व यंत्रणेद्वारे येथे येणाऱ्या स्थानिक रुग्णांची योग्य ती काळजी घेतली जाते व उपचार केले जातात. रुग्णालयात दाखल होणाऱ्या गंभीर व अत्यावस्थ असलेल्या रुग्णांना पुढील विशेष संदर्भ सेवेची आवश्यकता असल्यास अशाच रुग्णांना नजिकच्या शासकीय रुग्णालयामध्ये संदर्भित करण्यात येते.
(३) श्रेणीवर्धित १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे अंदाजपत्रक व आराखडे बाबतचा प्रस्ताव वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय, वाडा, जि.पालघर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मागविला आहे. सदर प्रस्ताव प्राप्त होताच पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तृतीयपंथीयांचा समाजाच्या मुख्यप्रवाहात समावेश करण्याबाबत

**(३९)** * **६१८ श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासनाने तृतीय पंथीयांसाठी कौशल्य विकास योजना सुरू केल्या असून या योजनांमार्फत अनेक तृतीयपंथीयांना लाभ देण्याबाबत धोरण निश्चित केले असून त्यांना लाभ देण्यात येत आहेत. मा.मुख्यमंत्री यांनी सन २०१४ मध्ये पालघर जिल्ह्यात हागणदारी मुक्त करण्याच्या योजनेत (ODF) सहभागी करुन घेतल्यानंतर तृतीयपंथीयानी केलेल्या प्रचार व प्रसारानंतर पालघर जिल्हा हागणदारी मुक्त (ODF) झाला आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, तृतीयपंथीयांना कौशल्य विकास विभागामार्फत योग्य ते प्रशिक्षण देऊन त्यांना शासकीय तसेच निमशासकीय नोकऱ्यामध्ये त्याचप्रमाणे शिक्षण संस्थामध्ये आरक्षणाचा लाभ देण्यात यावा अशी तृतीयपंथीयांकडून मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी तृतीयपंथीयांवर विश्वास व्यक्त करुन त्यांची पालघर जिल्हा हागणदारी मुक्त करण्याच्या योजनेत त्यांना प्रचार व प्रसारात सहभागी करुन घेवून त्याच धर्तीवर स्वच्छता अभियान प्रभावी होण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, कचरा फेकणे यावर आळा बसावा म्हणून तृतीयपंथियांचा क्लीनअपमार्शल म्हणून समावेश करून घेण्याबाबत शासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी योग्य ती कार्यवाही करण्याबाबत शासनाने कोणती निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ११/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे तृतीय पंथीयांसाठी धोरण-२०२४ निश्चित करण्यात आले असून कौशल्य विकासाच्या योजनांचा त्यात समावेश आहे.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांकः केआरसी ३६१५/प्र.क्र.०४/पापु-०८ दिनांक १७ जानेवारी, २०१५ अन्वये निर्गमित मार्गदर्शक सुचनांनुसार ग्रामपंचायतीमधील कुटुंबांना शौचालय बांधकामाकरीता प्रवृत्त करण्यासाठी निर्मलदूत नियुक्त करण्याची तरतुद आहे. त्यानुसार सन २०१६-१७ मध्ये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पालघर यांनी केवळ पालघर तालुक्यातील समुद्र किनार पट्टीच्या १२ ग्रामपंचायतीच्या मर्यादेत किन्नर माँ एक सामाजिक संस्थेची निर्मल दूत म्हणून नेमणूक केली होती. पालघर जिल्ह्यात एकूण ०८ तालुके आणि ४७७ ग्रामपंचायती असून केवळ पालघर तालुक्यात फक्त १२ ग्रामपंचायतीच्या मर्यादेत किन्नर माँ एक सामाजिक संस्थेची निर्मल दूत म्हणून नेमणूक केली होती. दिनांक ०२ ऑक्टोबर,२०१७ रोजी पालघर जिल्हा हागणदारी मुक्त (ODF) घोषीत करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत, स्वच्छ भारत अभियान (ग्रा), टप्पा-२ ही योजना सन २०२० पासून राबविण्यात येत आहे.

(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने प्रसिध्द केलेल्या राज्याच्या तृतीयपंथीयांचे धोरण-२०२४ मध्ये नमूद केल्यानुसार तृतीयपंथीयांना त्यांच्या प्रवर्गनिहाय सामाजिक, समांतर आरक्षण उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ०३/०३/२०२३ च्या शासन निर्णयाद्वारे तृतीय पंथीय या घटकातील वर्गास शिक्षण, नोकरी व शासकीय योजनांमध्ये लिंग पर्यायामध्ये "स्त्री", "पुरुष", "तृतीयपंथी" असे पर्याय उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तृतीयपंथी व्यक्ती त्यांच्या जातीनुसार आरक्षित प्रवर्गात आरक्षणाचा लाभ घेऊ शकतात.

(३) अशी बाब नाही.

स्वच्छ भारत अभियान (ग्रा), टप्पा-२ अंतर्गत क्लीनअपमार्शल नियुक्तीची तरतुद नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाड्यांना गरम आहार पुरवठा करण्याकरीताच्या निविदा प्रक्रियेस स्थगिती देण्याबाबत

**(४०) * १४७९ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाड्यांना महिला बचत गटामार्फत ताजा गरम आहार पुरवठा केला जात असून यासाठी आता खुल्या निविदांव्दारे स्पर्धा निर्माण करुन महिला संस्थांना व खाजगी मोठ्या आहार पुरविणाऱ्या ठेकेदारांना सदरहू कंत्राट देण्याबाबतचा निर्णय घेतला जात असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे महिला बचत गटांमध्ये काम करणाऱ्या सुमारे पाच लाख महिलांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होणार असून, सदरहू ताजा गरम आहार वितरण कंत्राट खुली निविदा प्रकिया सुरु करु नये यासाठी राज्यातील अन्यायग्रस्त अंगणवाडी व शालेय पोषण आहार पुरवठादार महिला बचत गटांकडून केंद्र व राज्य शासनाकडे विविध माध्यमातून मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने महिला बचत गटाच्या विविध माध्यमांच्या मागणीनुसार उक्त आहार पुरवठाच्या खुल्या निविदा प्रक्रियेचा निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही,

गरम ताजा आहार पुरवठा करण्यासाठी कोणत्याही प्रकारची निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.

(२) अंशतः खरे आहे.

गरम ताजा आहाराबाबत दिनांक ३१ जुलै, २०२४ पासून पुढे २ वर्ष टेंडर न काढता, महिला बचत गटांना किंवा मंडळांना अंगणवाड्यांना नाश्ता व आहार पुरवठ्याचे काम करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत महिला बचत गट पोषण आहार पुरवठा संघटना यांनी विनंती केली आहे.

(३) गरम ताजा आहार पुरवठ्याच्या अनुषंगाने बचत गटांच्या मागण्या उच्चस्तरीय समितीपुढे सादर करेपर्यंत सर्व निविदा प्रक्रिया स्थगित ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: मराठवाड्यातील जल जीवन मिशन योजनेंतर्गतची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४१) * २००१ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे ही प्रगती पथावर असून कामांचा दर्जा पाहण्यासाठी राष्ट्रीय जलजीवन मिशन समितीने राज्यभरातील १ हजार २४९ गावांना भेटी देऊन पाहणी केली असता राज्यातील किमान २१ जिल्ह्यात नियमबाहय पध्द्तीने कामे करून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात जलजीवन मिशनअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसून मराठवाड्यातील आठही जिल्हयांमधील प्रत्येक गावांमधील ग्रामस्थांनी उक्त कामांमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत तक्रारी केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाड्यात जलजीवन मिशन अंतर्गत १८६७ नळ पाणीपुरवठा योजनांची ३०० कोटीपेक्षा अधिक रकमेची देयके थकीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील जलजीवन मिशन अंतर्गत प्रलंबित असलेल्या पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच उक्त प्रकरणी गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या पाहणीकरीता जलशक्ती मंत्रालयाकडून वॉश तज्ञ समिती (National Wash Expert) मार्फत राज्यातील ५०३ गावांमध्ये पाहणी दौरा करण्यात आला होता.सदर गावांमध्ये ९४९ वेळा पाहणी करण्यात आली आहे. सदर पाहणी पथकाने उपस्थित केलेल्या त्रुटींचा पुर्तता अहवाल सादर करण्यात आला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत नागरिकांकडून तसेच लोकप्रतिनिधींमार्फत प्राप्त निवेदने व तक्रारीचे निराकरण करण्यात येते. सदर तक्रारी अथवा त्रयस्थ तपासणी यंत्रणेद्वारे करण्यात आलेल्या पाहणीमध्ये दोषी आढळल्यास संबंधितांवर योग्य कार्यवाही करण्यात येते.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत केंद्र हिस्साचा निधी मिळण्याच्या अनुषंगाने पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तथापि, केंद्र शासनामार्फत निधी प्राप्त नसल्याने राज्य हिस्साचा काही अंशी निधी विशेष बाब म्हणून अंमलबजावणी यंत्रणांना वितरित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील जल जीवन मिशन योजनेंतर्गत निधीअभावी कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४२) * १२६४ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२२ पासून जिल्हा परिषद अंतर्गत शुध्द पिण्याचे पाणी पुरविण्याकरीता जल जीवन मिशन योजना कार्यरत केली असून भंडारा जिल्ह्यात प्रति कुटुंब ५५ लीटर शुध्द पिण्याचे पाणी पुरविण्याच्या उद्देशाने सुरु झालेल्या या योजनांपैकी ० ते ७५ टक्क्यांपर्यंत कामे झालेल्या सुमारे १६२ योजना माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये केंद्र शासनाच्या निधीअभावी पूर्णपणे बंद पडल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या जलजीवन मिशन विभागाच्या माध्यमातून ८० गावातील या योजनेतंर्गत निर्धारित कामे माहे जून, २०२५ पर्यंत १०० टक्के पूर्ण करण्याकरीता रुपये २५ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निधी तात्काळ उपलब्ध करून योजनेचे काम पूर्ण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

जल जीवन मिशन योजनेंतर्गत पाणीपुरवठा योजनेची कामे निधी अभावी संथ गतीने सुरु आहेत.

(२) हे खरे आहे.

८० गावातील योजना पूर्ण करण्याकरीता रुपये २६.४० कोटी निधीची आवश्यकता आहे.

(३) सद्य:स्थितीत केंद्र शासनाकडून पहिल्या हप्त्याचा तिसरा भाग अप्राप्त आहे. सदर हिस्सा प्राप्त होण्यापुर्वीच शासनस्तरावरुन जल जीवन मिशनयोजनेंतर्गत सुरु असलेल्या कामांमध्ये अडथळा येवू नये याकरीता विशेषबाब म्हणून राज्य हिश्श्याचा निधी राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांना माहे- फेब्रुवारी, २०२५ मध्ये वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषदांमधील नेट सेट पात्रताधारक शिक्षकांना पदोन्नती देण्याबाबत

**(४३)** * **१८६० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदांमधील शिक्षण विभागांतर्गत पर्यवेक्षीय यंत्रणा आणि प्रशासन या गटातील विस्तार अधिकारी शिक्षण तसेच केंद्रप्रमुख आदी मंजूर पदांमधील ५० टक्के पेक्षा जास्त पदे रिक्त असल्याने कार्यरत शिक्षण यंत्रणेवर अतिरिक्त ताण असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये नेट सेट या उच्च शैक्षणिक पात्रताधारक शिक्षक कार्यरत असून त्यांनी विस्तार अधिकारी शिक्षण व केंद्रप्रमुख अशा वरिष्ठ पदांवर पदोन्नती देण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील शिक्षकांना पदोन्नती दिल्यास कार्यरत असणाऱ्या शिक्षण यंत्रणेवरील ताण कमी करण्याच्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

तथापि, जिल्हा परिषदांमधील कार्यरत नेट सेट या उच्च शैक्षणिक पात्रताधारक शिक्षकांना विस्तार अधिकारी शिक्षण व केंद्रप्रमुख या पदावर पदोन्नती देण्याबाबतची तरतुद प्रचलित सेवा प्रवेश नियमांमध्ये नाही.

विस्तार अधिकारी शिक्षण या संवर्गाची १८७१ पदे मंजूर असून त्यापैकी १०५५ पदे भरलेली व ८१६ पदे रिक्त आहेत.

पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर करण्यात येत आहे. तसेच सरळसेवा पदभरती २०२३ अंतर्गत विस्तार अधिकारी शिक्षण पदाची एकूण ८१ पदांची पदभरती प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे.

केंद्रप्रमुख पदाच्या पदोन्नतीच्या अनुषंगाने एकसमानता रहावी, याकरीता शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १/१२/२०२२ व दिनांक २७/०९/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये केंद्रप्रमुख पदावरील निवडीची कार्यपध्दती व अर्हता या अनुषंगाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील सूचना विचारात घेऊन शालेय शिक्षण विभागाचे अभिप्रायानुसार केंद्रप्रमुख पदाच्या सेवाप्रवेश नियमाची सुधारित अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

केंद्रप्रमुख संवर्गाची एकूण ४८६० इतकी पदे मंजूर असून, त्यापैकी १९२२ पदे भरलेली आहेत व २९३८ पदे रिक्त आहेत.

(३) सदर रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी (शिक्षण) यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.